१ ला वार्षिक अहवाल १९९७-९८

ओम नमः शिवाय

निलकंठ

निलकंठ अर्बन को-ऑप. बँक लि. सोलापूर

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

फक्त सभासदांसाठी

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेस येते की, या बँकेची सन १९९७-९८ ची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. १०-८-९८ रोजी, दुपारी ४ वाजता दमाणि परिषद कक्ष, दमाणि सभागृह, सात रस्ता, सोलापूर येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी होणार आहे. तरी सदर सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

सभेपुढील विषय

१) मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२) दि. ३१/३/९८ अखेरचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) सन १९९७-९८ ची नफा वाटणी मा. संचालक मंडळाचे शिफारशीनुसार मंजूर करणे.

४) मा. सरकारी ऑडीटर यांच्या सन १९९७-९८ चा ऑडिट रिपोर्ट वाचून नोंद घेणे.

५) सन १९९८-९९ सालाकरिता मा. संचालक मंडळानी तयार केलेले खर्च व उत्पन्नाचे अंदाजपत्र यास मंजूरी देणे.

६) सन १९९८-९९ करिता बाहेरील कर्ज मर्यादा ठरविणे

७) सन १९९८-९९ सालासाठी अंतर्गत हिशोब तपासणीसाची नेमणूक करणे.

८) मा. चेअरमन यांच्या अनुज्ञेने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे

मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेवरुन

सोलापूर

दि. २५/७/९८

हि. सो. तडकासे

मुख्य व्यवस्थापक

सूचना

१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेपेक्षा अर्ध्यातासानंतर घेतली जाईल व त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.

२) दि. ३१/३/९८ अखेरच्या ताळेबंद व नफातोटा पत्रकासंबंधी काही माहिती, स्पष्टीकरण विचारवयाचे असल्यास त्यांनी दि. ५/८/९८ पर्यंत बँकेच्या कार्यालयात बँकेच्या वेळेत मुख्य व्यवस्थापक यांच्याकडे लेखी कळवावे. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

फोन - ७२८१०४ चेअरमन
७२८१०५ कार्यालय
६२१४५५ मुख्य व्यवस्थापक

संचालक मंडळ

श्री. विश्वनाथ ला. करवा	चेअरमन
श्री. बाबूभाई शं. मेहता	व्हा. चेअरमन
श्री. किशोर कि. मर्दा	संचालक
श्री. विष्णूदास र. बंग	संचालक
श्री. रमेश ब. राठी	संचालक
श्री. घनश्याम भ. जाखोटीया	संचालक
श्री. चारुकिर्ती मा. शिरसोडे	संचालक
श्री. संजय रा. करवा	संचालक
श्री. नंदकिशोर श्री. तिवाडी	संचालक
श्री. पुरुषोत्तम दु. बलदवा	संचालक
श्री. विजय लो. उपाध्ये	संचालक
सौ. विमला ज. लाहोटी	संचालिका
कु . मंगलेशा ब. बेदमुथा	संचालिका
श्री. अजय ब. म्हंता	संचालक
श्री. मल्हार गु. पाटोळे	संचालक

श्री. हिटलर सोमेश्वर तडकासे
मुख्य व्यवस्थापक

ठेवीच्या योजना

अ.क्र.	ठेव मुदत	व्याज दर
१)	३० दिवस ते १ वर्ष	१२%
२)	१३ महिने ते ३ वर्ष	१५%
३)	३ वर्षाच्या पुढे	१५.५%
४)	धनमान दुप्पट	५५ महिने
५)	धनमान तिप्पट	८७ महिने
६)	धनमान चौपट	११७ महिने
७)	आधार पेन्शन ७ वर्षे १००रू भरल्यास १५०८३ मिळतील किंवा मुदतीनंतर रू ११५ हयातीपर्यंत पेन्शन मिळेल.	
८)	लक्षपुर्ती ठेव २५.४५० भरून १०८ महिन्यानी १ लाख घेणे	
९)	अल्पबचत ठेव (पिग्मी योजना)	
१०)	**बाल संवर्धक योजना** बँकेने बालकांच्या शैक्षणिक दृष्टिकोनातून निर्माण केलेली ही योजना. यामध्ये गुंतवणुकदारांनी रू ६५०० /- ठेव १८ वर्षे ठेवल्यास मुदतीअंती त्याना रू १ लाख मिळतील.	

बँकेतील रू १ लाखापर्यंतच्या सर्व ठेवी "डिपॉझिट इन्सुरन्स कॉर्पोरेशन" कडून संरक्षित आहेत.
टीप :- रिझर्व बँकेच्या धोरणानुसार व्याजदरात वेळोवेळी बदल होतील, अधिक माहितीसाठी संपर्क साधा.

दृष्टीक्षेपात आकडेवारी - दिनांक ३१ मार्च १९९८

आकडे लाखात

१)	भागभांडवल	रु. २७.७९
२)	राखीव निधी	रु. ०.९४
३)	ठेवी	रु. ३१६.०१
४)	गुंतवणुक	रु. ९५.५७
५)	दिलेली कर्जे	रु. १४४.४५
६)	नफा	रु. ०.९७
७)	एकुण खेळते भांडवल	रु. ३६१.२१

उत्पन्न	खर्च	नफा
१७.५०	१६.५३	०.९७ (९६,९४०.७७)

बँकर्स

१) महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि. मुंबई
२) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सोलापूर मुख्य शाखा व सिध्दार्थ शाखा
३) बँक ऑफ बडोदा- मुख्य शाखा, चाटी गल्ली सोलापूर
४) सोलापूर जनता सह. बँक लि. सोलापूर मुख्य शाखा व मुंबई शाखा

परिशिष्ट 'अ' (रु. लाखात)

१)	संस्थेचे नांव	**निलकंठ अर्बन को.-ऑपरेटीव्ह बँक लि. सोलापूर** २०२, शुक्रवार पेठ, गंगनहळ्ळी मार्केट, माणिक चौक, सोलापूर-२		
२)	रजिस्ट्रेशन नं. तारीख	एस.यु.आर./बी.एन.के.(ओ) १२१ सन १९९६-९७ दि. ७/१/९७		
३)	आर.बी.आय. लायसन्स नं. व तारीख	आर.बी.आय.- यु.बी.डी.- महाराष्ट्र १३८४ दि. ३/३/१९९७		
४)	बँकेचे कार्यक्षेत्र	सोलापूर शहर व १० कि.मी. परिसर		
५)	तपशील	३१ मार्च १९९८		
६)	मुख्य कार्यालय सह शाखा	मुख्य कार्यालय, शाखा नाही		
७)	सभासद संख्या	कायम सभासद २७३७ नाममात्र सभासद ३८		
८)	खपलेले / वसुल झालेले भाग भांडवल	२७.७९		
९)	एकूण गंगाजळी व इतर निधी	०.९४		
१०)	ठेवी	३१६.०९	१) चालू ठेवी -	३३.५१
			२) बचत ठेवी -	९.८६
			३) मुदत ठेवी -	२७२.७२
११)	कर्जे	१४४.४५		
			तारणी कर्जे	१३४.८८
			विनातारणी कर्जे	९.५७
		प्रमाण		
		अग्रक्रम क्षेत्रासाठी ३९.०९		
		दुर्बल घटकासाठी ३.४०		
१२)	उचलेली बाहेरील कर्जे	सोलापूर जि. म. सह. बँक		----
		एम.एस.सी. बँक, मुंबई		----
१३)	गुंतवणुक	रु. ९५.५७ लाख		
१४)	थकबाकीचे प्रमाण	नाही		
१५)	ऑडिट वर्ग	"अ"		
१६)	नफा तोटा	नफा रु. ०.९७ लाख		
१७)	एकूण कर्मचारी	११		
	मुख्य व्यवस्थापक	१		
	अधिकारी	१		
	लिपीक	६		
	शिपाई	३		
	एकूण	११		
१८)	एकूण खेळते भांडवल	रु. ३६१.२१ लाख		

विश्वनाथ करवा
संस्थापक, चेअरमन

प्रिय सभासद बंधु भगिनींना
सप्रेम नमस्कार

मागे वळुन पाहता सहा महिन्याचा कालखंड बँकेने यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या यशाची पायाभरणीच आपण केली आहे. निलकंठ बँकेच्या स्थापनेपासून किंबहूना बँकेच्या उभारणीसाठी घेण्यात आलेल्या प्रत्येक बैठकीस आपण अपूर्व उत्साह दाखविला, प्रेरणा दिली आणि पाठीशी उभे राहिलात. आता या छोट्या रोपट्याचे अल्पावधीत वटवृक्षात रुपांतर होईल याची मला खात्री आहे.
आज आपणासमोर बँकेचा प्रथम वार्षिक अहवाल सादर करताना मला अत्यानंद होत आहे. खातेदार, ग्राहक राजाच्या सेवेसाठी आणि बहुसंख्य सभासदांच्या सदैव सानिध्यात रहाण्यासाठी बँकेचे कार्यालय शहरातील मध्यवर्ती भागात माणिक चौक येथे काढले.

साडेतीन मुहूर्तापैकी महन्मंगल अशा दसऱ्याच्या सुवर्णदिनी दि. ११ अक्टोबर १९९७ रोजी बँकेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. जयप्रकाशजी मुंदडा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हुतात्मा स्मृती मंदिरातील हा अभूतपूर्व सोहळा उपस्थितांच्या कायम स्मरणात राहिल.
मागील दोन वर्षाच्या कालावधीत सोलापूर शहरात नव्याने अनेक सहकारी बँका उघडण्याची परवानगी देण्यात आली. त्यामुळे बँकीग क्षेत्र तीव्र स्पर्धेचे झालेले आहे. यासाठीच आपल्या बँकेने स्पर्धात्मक घोडदौड न करता ठराविक उद्देशाने परंतु भक्कम मार्गक्रमण करण्याचे ठरविले आहे.

मार्च १९९८ अखेर बँकेने सहामाहीपेक्षा कमी कालावधीत ३ कोटी रुपयांच्या ठेवींचे उद्दिष्ट साध्य केले आहे. सभासदांसाठी हे गौरवास्पद असून बँकेने सोलापूरातील नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे ही बाब अभिमानास्पद आहे.

ठेवीदारांच्या ठेवीवर शक्य तेवढे जास्त व्याज देणे, सभासदांचे हितरक्षण करणे याशिवाय अत्यंत महत्वपूर्ण म्हणजे बँकेच्या उत्पन्नद्वारे सोलापूर शहराचा सांस्कृतिक विकास घडविणे. हा उद्देश बँकेने उद्घाटन प्रसंगीच घोषित केला आहे. सर्वच गोष्टी एकाचवेळी साध्य होण्यासारख्या नसल्या तरी प्रत्येक वर्षी होणाऱ्या उत्पन्नातून जे साध्य करता येईल ते करण्याचा संचालक मंडळ आवर्जुन प्रयत्न करेल याची मी ग्वाही देतो. आपला परिपूर्ण विश्वास यातच बँकेचा विकास आहे आणि आपलाही विकास आहे. एकमेका साह्य करु, अवघे धरु सुपंथ !

❖ सभासद संख्या व भागभांडवल

दि. ३१/३/९८ अखेर आपल्या बँकेची सभासद संख्या २७३७ असून एकूण भाग भांडवल रु. २७,७९,000/ एवढे आहे.

❖ गंगाजळी व इतरनिधी

बँकेचे हे पहिलेच वर्ष असून अद्याप नफा वाटणी व्हावयाची असलेने ३१/३/९८ अखेर सभासदांची प्रवेश फी व नाममात्र सभासदांची फी धरुन एकूण रक्कम रु. १४,०४५/- राखीव निधी (रिझर्व फंड) असा आहे.

❖ ठेवी

बँकेची नोंदणी दि. ७/१/९७ रोजी झालेनंतर फक्त दोनच महिन्याच्या आत रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे कडून बँकिंग व्यवसायाचे लायसेन्स मिळाले व त्यानंतर दसऱ्याच्या सुवर्ण दिनी म्हणजे दि.११/१०/९७ रोजी सहकार मंत्री श्री. जयप्रकाशजी मुंदडा यांच्या शुभहस्ते उद्घाटन होऊन बँकेच्या कामकाजास सुरुवात झाली. बँकिंग व्यवसाय सुरु केल्यापासून ते ३१/३/९८ पर्यंत अत्यंत विनम्र सेवा प्रदान करुन ग्राहकांची मने जिंकली आहे. व सभासदांनी, ठेवीदारांनी उत्स्फुर्तपणे सहकार्य दिल्यामुळेच अहवालकाळात बँकेच्या एकूण ठेवी रु. ३१६.०१ लाख इतक्या झाल्या व बँक आज भरभक्कम स्थितीत उभी आहे.

❖ गुंतवणुक

बँकींग व्यवहारात आवश्यक असलेली तरलता व लाभतेच्या दृष्टीने सुरक्षित अशी बँकेनी ३१/३/९८ अखेर एकूण रु. ९५.५७ लाखाची गुंतवणुक केली आहे.

❖ कर्जे

बँकेने कर्जाचे कारण व तारण सुरक्षितता व इतर आवश्यक बाबींचा सांगोपांग विचार करुन गरजवंताना म्हणजे व्यापारी, कारखानदार, नोकरदार, टेम्पो-रिक्षा, डॉक्टर्स, कॉन्ट्रॅक्टर व इतर दुर्बल घटकांतील व्यक्तींना कर्ज पूरवठा केला आहे.

आतापर्यंत बँकेने रु. १४४.४५ लाख इतका कर्ज पुरवठा केला असून त्यापैकी अग्रक्रम क्षेत्रास रु. ५६.४७ लाख व दुर्बल घटकास रु. ४.९२ लाख इतका कर्जपुरवठा केला आहे. हे प्रमाण एकूण कर्जाच्या अनुक्रमे ३९.०९% व ३.४०% असे आहे.

❖ थकबाकी

माहे डिसेंबर ९७ पासून कर्जपुरवठा सुरु केला असल्याने मार्च ९८ अखेर थकबाकी नाही.

❖ उत्पन्न संकल्पना : जिंदगीचे वर्गीकरण व तरतूद

दि. ३१/३/१९८ अखेर बँकेनी दिलेल्या कर्जाची कसलीही थकबाकी नाही त्यामुळे वरील प्रमाणे वर्गीकरण व तरतुदी करण्याची गरज पडलेली नाही.

यापुढे ही कर्जदार सभासदांनी आपली कर्जे थकीत होवू नये याची काळजी घ्यावी असे आवाहन मी करत आहे.

❖ ऑडिट

दि. ३१/३/९८ अखेर संपलेल्या मुदतीचे लेखापरीक्षण मा. श्री एस. बी. मोरेसाहेब यांनी केले आहे. तपासणी मुदतीत त्यांनी बँकेस उपयोगी असे मार्गदर्शन केले आहे. बँकेच्या कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी सन १९९७-९८ सालाकरता "लेखापरीक्षण वर्ग 'अ' दिला आहे." हे नमूद करण्यास मला अतिशय आनंद होत आहे.

❖ संचालक मंडळ

सुरुवातीपासून दि. ३१/३/९८ अखेरपर्यंत संचालक मंडळाच्या एकूण १४ सभा झाल्या. सर्व सभांचे कामकाज खेळीमेळीने, एकमताने व यथायोग्य पार पाडण्यास सर्व संचालकांनी योग्य व जरुर ते सहकार्य केलेले आहे.

दि. ३१/३/९८ अखेर संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती खालील प्रमाणे आहे. (रू. लाखात)

❖ संचालक व नातेवाईक कर्जे

अ.क्र.	तपशील रक्कम	मंजूर रक्कम	सह वर्षात दिलेली रक्कम	सह वर्षात फेडलेली रक्कम	सह वर्षात येणेबाकी रक्कम	येणे पैकी थकीत
१)	संचालकाना दिलेली कर्जे (वाहनतारण)	२.७०	२.७०	०.२७	२.५६	—
२)	संचालकाच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे (न ग. - ओ. डी)	७.००	१५.६८	९.५७	६.११	—

टीप :- कॉलम नं. ४ व ५ मधील आकडे उलाढाली स्वरूपाचे आहेत.

दिलेल्या कर्जाची विगतवारी - ३१/३/९८ अखेर

अ.नं.	तपशील व कारण	कर्जदारांची संख्या	कर्ज रक्कम (रू. लाखात)
१)	लघु उद्योग	१४	३०.७७
२)	स्वंयरोजगार व व्यावसायिक	७	११.६३
३)	वाहतुक व्यवसाय	२	२.९८
४)	किरकोळ व्यापार	१३	११.०९
५)	घाऊक व्यापार	२०	५५.४९
६)	लग्न लग्नसमारंभ इ. साठी	- -	- -
७)	अत्यावश्यक गरजेसाठी	- -	- -
८)	घरगुती व बांधकाम	- -	- -
९)	शैक्षणिक कर्जे	- -	- -
१०)	इतर (घरगुती वस्तु) कर्जे	५८	३२.४९
	एकूण	**११४**	**१४४.४५**

१०) नफा वाटणी दि. ३१/३/९८ अखेर आवश्यक त्या तरतुदी वजा जाता बँकेस रू. १६,१४०.७७इतका निव्वळ नफा झालेला आहे. सदर नफ्याची वाटणी खालील प्रमाणे करण्याची मा.संचालक मंडळाची शिफारस आहे.

१) राखीव निधीरू. २४,२४०-00

२) लाभांश समिकरण निधी रू. २७.७१०-00

३) इमारत निधी रू. ४४, १९०-७७

बँकेच्या पहिल्या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कामकाजाचा कालावधी सुमारे सहा महिन्याचा होता व बँकेच्या सर्वांगिण विकासाचा विचार करता या वर्षासाठी लाभांश न देण्याचे संचालक मंडळाने ठरविले आहे.

११) कर्मचारी वर्ग :-
बँकेचा कर्मचारी हा बँकींग व्यवसायाचा कणा असून दि. ३१/३/९८ अखेर एकूण ११ कर्मचारी बँकेत कार्यरत असून त्यांनी तळमळीने व हसतमुखाने केलेली तत्पर व विनम्र सेवा अभिनंदनीय आहे. हे मी नमूद करीत आहे.

आभार !

महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री **श्री.ना.जयप्रकाशजी मुंदडा**,कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी खा.श्री. **लिंगराजजी वल्याळ**, सहकार राज्य मंत्री **श्री. प्रतापसिंह मोहिते पाटील**, विधी व न्याय राज्यमंत्री **श्री. दिलीपराव सोपल, मा. खा. श्री. सुशीलकुमारजी शिंदे, मा.खा.श्री संदीपानजी थोरात, मा.आ.श्री. नरसिंगजी मेंगजी**, मा. आमदार **श्री. सुभाष देशमुख**, माजी आमदार **श्री. बाबुरावजी चाकोते**, विणकर रत्न **श्री. गंगाधरपंत कुचन**, संस्थापक चेअरमन - यशवंत सह.बँक **श्री. ब्रम्हदेवजी माने**, माजी राज्यमंत्री **श्री. कमळे गुरूजी**, माजी आमदार **श्री. विठ्ठलराव दिकोंडा**, माजी सेवादल अध्यक्ष श्री. **पन्नालालजी सुराणा**, दे.भ.स्वा.सै. **हरिनारायणजी सोनी**, संस्थापक चेअरमन - नागरी औद्यो. सह. बँक, **श्री.मुरलीधरजी मुतडा**, माजी अध्यक्ष - सोलापूर औद्यो. सह. बँक **श्री.सत्यनारायण बोल्ली**, अध्यक्ष- सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज् उद्योगपती **श्री. प्रेमरतनजी दामाणि**, संस्थापक अध्यक्ष- विकास सह. **बँक श्री. रामनिवासजी जाजू**, उद्योगपती **श्री. बिपीनभाई पटेल**, उद्योगपती **श्री. दत्ताअण्णा सुरवसे**, तसेच दै. संचार, दै. लोकमत, दै. तरूण भारत, दै. सकाळ, दै. विश्वसमाचार, व्हीडीओ दैनिक सोलापूर वृत्तदर्शन व सर्व पत्रकार बंधू त्याच प्रमाणे महाराष्ट्र राज्याचे मंत्रालयातील सहकार खात्यातील अधिकारी **श्री.टेकाडे सो, श्री. कोयंडे सो, व श्री. सोनी सो**, या सर्वांचा बँकेच्या उभारणीस मोलाचा सहभाग लाभला या करीता मी या सर्वांचा हार्दिक आभारी आहे.

त्याचप्रमाणे इतर संस्था व व्यक्तींनी बँकेच्या दैनंदिन कामकाजात सतत सहकार्याचा हात पुढे केला त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच बँकेच्या स्थापनेपासून दैनंदिन व्यवहारात पुढील संस्था,व्यक्तीनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले आहे. सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज, राजस्थानी विकास मंडळ, सोलापूर सूत व्यापारी संघ, **दे.भ. हरिनारायण सोनी** पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, माहेश्वरी सांस्कृतिक भवन, रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ, जिल्हा **उप.निबंधक सह. संस्था** सोलापूर **श्री माने साहेब**, असिस्टंट रजिस्ट्रार सह. संस्था सोलापूर श्री. **श्रीकांत मोरे साहेब व त्यांच्या कार्यालयातील** अधिकारी वर्ग, बँक ऑफ बडौदा चाटी गल्ली सोलापूर येथील **श्री. दिवाणसाहेब** व त्यांचे अधिकारी व **कर्मचारी वर्ग, सो.जि.** मध्य, सह. बँक.हेड ऑफिस **श्री. भरत चव्हाण साहेब**, सो.जि. मध्य. सह. बँक. सिध्दार्थ **शाखा अधिकारी व सेवक वर्ग**, महा. राज्य सह. बँक लि. मुंबई, महा. राज्य नागरी सह. बँक्स फेडरेशन मुंबइ **श्री. एल.एच. गाजरे साहेब**, सो. नागरी सह बँक्स असोशिएशन सोलापूर **श्री. मलिकार्जुन कावळे**, सो.जनता सह. बँक नवीपेठ व मुंबई शाखा, बँकेचे पहिले लेखापरिक्षक. सरकारी हिशोब तपासणीस **श्री.एस.बी. मोरे साहेब** यांनी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मा. संचालक मंडळाच्या वतीने मी आभार मानतो. तसेच **मा.खा. श्री. लिंगराजजी वल्याळ**, आमदार **श्री. सुभाष देशमुख** व अध्यक्ष सो.दुध संघ **श्री. मनोहर डोंगरे** यांनी बँकेस भेटी देऊन मार्गदर्शन केले. व हार्दिक शुभेच्छा देऊन उपकृत केले या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

संचालक मंडळातील माझे सहकारी, बँकेच्या कर्मचारी वर्गाचे उत्तम सहकार्य तळमळीचे परिश्रम व सुत्रबध्द नियोजन यामुळे बँकेची जनमानसात प्रतिमा उत्तमरितीने उंचावत आहे. जनतेचा विश्वास वाढीला लागल्यामुळे दिवसागणिक बँकेच्या ठेवीत व कर्जव्यवहारात वाढ होत आहे.

बँकेच्या लौकिकात ठेवीदार, खातेदार, सभासद हितचिंतक आणि इतर अनेकांचे सहकार्य व सदिच्छा लाभल्या आहेत त्या सर्वांचा मी हार्दिक आभारी आहे.

सर्वांच्या सहकार्याने यापुढेही बँकेची प्रगती होईल अशी मी अपेक्षा करतो.

स्नेह, प्रेम आपुलकीचा
सदैव वर्षाव व्हावा
आपला अर्थ,सौख्य ठेवा
अमृतमय व्हावा

वि. ला. करवा

वि. ला. करवा

चेअरमन

ताळेबंद पत्रक दिनांक ३१-३-९८ रोजीचा

भाग भांडवल व देणे

		रुपये पैसे	रुपये पैसे
१) भाग भांडवल			
अ) अधिकृत भाग भांडवल रु. २५/- प्रमाणे २,००,००० शेअर्स			५०,००,०००.००
ब) वसूल भाग भांडवल प्रत्येकी रु. २५ प्रमाणे १,११,१६०		२७,७९,०००.००	२७,७९,०००.००
२) गंगाजळी व इतर निधी			
अ) राखीव निधी			१४,०४५.००
३) ठेवी			३,९६,०८,५५३.८८
१) मुदत ठेवी		२५६१०६१४.००	
अ) व्यक्तीगत	२,३१,१०,६१४.००		
ब) सहकारी संस्था	२५,००,०००.००		
२) सेव्हिंग्ज ठेवी		९,८६,२९४.८२	
अ) व्यक्तीगत संस्था	९,८६,२९४.८२		
ब) सहकारी संस्था			
३) चालू ठेवी		३३,५१,०३५.०६	
अ) व्यक्तीगत संस्था	३३,५१,०३५.०६		
ब) सहकारी संस्था			
४) आवर्तक		१,६६,५३४.००	
५) आधार पेन्शन		१,८४,२००.००	
६) अल्प बचत (पिग्मी ठेव)		१३,०९,८७६.००	
४) कर्ज		—	—
५) वसुलीसाठी आलेली बिले (दुबेरजी)			
ओ.ई.ते			३,३३,३२७.२६
६) व्याज देणे			८९९९८०.००
पुढील पानावर			३,५६,३४,१०६.९४

ताळेबंद पत्रक दिनांक ३१-३-९८ रोजीचा

भाग भांडवल व देणे

		रुपये पैसे	रुपये पैसे
मागील पानावरून			३,५६,३४,१०६.९४
६) इतर देणी			७,२२,३०५.५०
१) पे. ऑर्डर पेअेबल	५४,७१२.५०		
२) टॅक्स पेअेबल ऑन एफ.डी.	३,५६१.००		
३) ऑडिट फी	१०,०००.००		
४) शिक्षण निधी	५०००.००		
५) ॲडव्हान्स फॉर डि.डि.	६,४८,९५२.००	७,२२,३०५.५०	
७) चालू वर्षाचा नफा			९६,१४०.७७
			३,६४,५२,५५३.२१

श्री. वि. ला. करवा चेअरमन	श्री. बा. शं. मेहता व्हा. चेअरमन	श्री. वि. र. बंग संचालक
श्री. चा. म. शिरसोडे संचालक		श्री. कि. कि. मर्दा संचालक
	श्री. हि. सो. तडकसे मुख्य व्यवस्थापक	

ताळेबंद पत्रक दिनांक ३१-३-९८ रोजीचा

जिंदगी व येणे

		रुपये पैसे	रुपये पैसे
१) **रोख शिल्लक**			११,००,२९३.९४
२) **बँकेतील शिल्लक**			५८,०२,७६३.१५
१) सो.जि. मध्य. सह. बँक मुख्य शाखा		१,०५,९५८.००	
२) सो.जि. मध्य. सह. बँक सिध्दार्थ शाखा		१,४६,९८०.८७	
३) बँक ऑफ बडोदा		५०,७३,१५०.८३	
४) महा. राज्य. सह. बँक मुंबई		३१,२०७.३५	
५) सो. जनता सह. बँक मुख्य शाखा सोलापूर		३,९९,२८८.००	
६) सो. जनता. सह. बँक, शाखा - मुंबई		४६,१७८.१०	
३) **गुंतवणुक**			९५,५७,०००.००
१) सो. जि. मध्य सह. बँक		८०,००,०००.००	
२) बँक ऑफ बडोद		१०,००,०००.००	
३) इंदिरा विकास पत्र		५,००,०००.००	
४) रिझर्व फंड मुदत ठेव		५६,०००.००	
५) महाराष्ट्र राज्य सह. बँक (शेअर्स)		१,०००.००	
४) **कर्जे**			१,४४,४४,५०७.३०
अ) अल्प मुदतीचे कर्ज		४,८६,३६३	
१) सरकारी विश्वस्त कर्ज रोख्याचे तारणावर	----		
२) इतर तारणावर	८३,२६०.००		
(पैकी थकबाकी)	----		
३) विनातारणावरील	४,०३,१०३.००		
ब) मध्यम मुदतीचे कर्ज			
१) सरकारी विश्वस्त कर्ज रोख्याचे तारणावर	----		
२) अन्य तारणावर	१,३४,०४,७४१.३२	१,३९,५८,१४४.३०	
३) विनातारण जामिनकी कर्ज	५,५३,४०२.९८		
(पैकी थकबाकी)	----		
क) दिर्घ मुदतीचे	----		
पुढील पानावर			**३,०९,०४,५६४.३९**

ताळेबंद पत्रक दिनांक ३१-३-९८ रोजीचा

जिंदगी व येणे

	रुपये पैसे	रुपये पैसे
पुढील पानावर		**३,०९,०४,५६४.३९**
५) **वसुलीस आलेली बिले (दुबेरजी)**		
१) ओ.बी.आर.		३,३३,३२७.२६
६) **येणे व्याज**		९,८२१.००
१) ठेवीवरील	९,८२१.००	
७) **इमारत**		६,०४,९५१.१३
८) **डेटस्टॉक व फर्निचर**		८,४५,५२९.२०
१) डेडस्टॉक	२,५७,१६०.००	
२) फर्निचर व फिक्चर	५,८८,३६९.२०	
९) **लायब्ररी**		१,८३०.००
१०) **इतर येणे**		३७,५४,१२९.४३
१) टेलिफोन व एम.एस.इ.बी. डिपॉजीट	७,०००.००	
२) प्रिंटिंग व स्टेशनरी स्टॉक	५,२९,०८७.५०	
३) इतर येणी	८३,१५४.००	
४) बँक प्रिलिमिनरी खर्च	६२,२७३.९३	
५) क्लिअरींग ॲडजेस्टमेंट	३०,६६,३८९.००	
६) दिवाळी ॲडव्हान्स	६,२२५.००	
		३,६४,५४,१५२.४१

श्री. वि. ला. करवा
चेअरमन

श्री. बा. शं. मेहता
व्हा. चेअरमन

तपासले सोबत जोडलेल्या शेऱ्यास
अनुसरुन बरोबर आहे

श्री. वि. र. बंग
संचालक

श्री. चा. मा. शिरसोडे
संचालक

एस बी. मोरे
अप्पर लेखा परिक्षक सह संस्था
(विणकर) सोलापूर

श्री. कि. कि. मर्दा
संचालक

श्री. हि. सो. तडकासे
मुख्य व्यवस्थापक

दिनांक ३१ मार्च १९९८ या वर्षाचा नफा तोटा पत्रक

	खर्च	रूपये पैसे	रूपये पैसे
१)	ठेवीवरील व्याज		१३,०९,५२२.००
२)	कर्मचाऱ्यांचे पगार		१,०५,७००.००
३)	स्टेशनरी,छपाई,जाहिरात खर्च		११,६१८.१५
४)	टपाल, दूरध्वनी खर्च		६,५४१.२५
५)	विमा, विजखर्च व इतर कर		१९,३८८.७५
६)	दुरूस्ती		१८०.०१
७)	कर्जावरिल व्याज		३,१२९.३०
८)	संचालक सभा खर्च		१,५६९.५०
९)	इतर खर्च व तरतूदी		
	अ) पिग्मी कमिशन	४०,७५२.००	
	ब) किरकोळ खर्च	२२,६३९.२०	
	क) देणगी	२,२७५.००	
	ड) लॉकर भाडे	२००.००	
	इ) प्रवास खर्च	२,७४७.४२	
	फ) क्लिअरिंग हाऊस व इतर चार्जेस	३,७३१.००	
	ख) शिपाई गणवेश	३,२८९.००	
	ग) ऑडिट फी	१०,०००.००	
	घ) शिक्षण निधी	५,०००.००	
	च) प्रिलीमनीरी खर्च तरतूद	१५,६००.००	
	छ) कंन्सलटेशन फी	१,०००.००	१,०७,२३३.६२
१०)	निव्वळ नफा		९६,९४०.७७
		एकूण..	१७,४९,९०३.३५

श्री. वि. ला. करवा
चेअरमन

श्री. बा. शं. मेहता
व्हा. चेअरमन

श्री. वि. र. बंग
संचालक

श्री. हि. सो. तडकासे
मुख्य व्यवस्थापक

दिनांक ३१ मार्च १९९८ या वर्षाचा नफा तोटा पत्रक.

	उत्पन्न	रूपये पैसे	रूपये पैसे
१)	व्याज व वाटप		
	अ) कर्जावरील व्याज	१०,३३,२५२.५०	
	ब) गुंतवणुकीवरील व्याज	६,६७,८१४.००	१७,०१,०६६.५०
२)	कमिशन व ब्रोकरेज		२८,५८५.३५
३)	इतर जमा		
	अ) किरकोळ जमा	१,९२५.००	
	ब) इन्सिडेन्टल चार्जेस	६,४१७.५०	
	क) बँक गॅरंटी फी	१५०.००	
	ड) प्रोसेस फी	११७५९.००	
			२०२५१.५०
		एकूण..	१७,४९,९०३.३५

तपासले सोबत जोडलेल्या शेऱ्यास
अनुसरून बरोबर आहे

श्री. चा. मा. शिरसोडे
संचालक

श्री. कि. कि. मर्दा
संचालक

एस बी. मोरे
अप्पर लेखा परिक्षक सह संस्था
(विणकर) सोलापूर

सन १९९८-१९९९ सालचे अंदाजपत्रक

खर्च (आकडे रु. लाखात)

अ.न.	खात्याचे नांव	३१/३/९७ चा अंदाज	९७-९८ चा प्रत्यक्ष झालेला खर्च	९८-९९ चा अंदाज
१	दिलेले व्याज-ठेवीवरील		१३.१०	९०.००
२	दिलेले व्याज कर्जावरील		०.०३	०.१५
३	नोकर पगार व भत्ते		१.०६	१.५०
४	दिवाबत्ती -लाईट विमा-कर		०.१८	०.४०
५	संचालक मिटिंग खर्च		०.०२	०.०५
६	वर्गणी - देणगी		०.०३	०.०५
७	ऑडिट फी		०.१०	०.१५
८	डेड स्टॉक घसारा		---	१.००
९	स्टेशनरी - छपाई		०.५६	०.७०
१०	जाहीरात		०.४२	०.३०
११	अ.ब.क. ठेव कमीशन		०.४१	०.९०
१२	टपाल तार		०.०२	०.०५
१३	टेलिफोन ट्रंक कॉल		०.०४	०.१५
१४	सामान्य खर्च		०.२३	०.२५
१५	प्रवास खर्च		०.०३	०.०५
१६	रिक्षा भाडे		---	०.०५
१७	डायरेक्टर फी भत्ते		---	---
१८	शिपाई ड्रेस		०.०३	---
१९	जनरल मिटिंग खर्च		०.०१	०.१०
२०	उद्घाटन समारंभ खर्च		---	---
२१	रिपेअर्स - मेंटेनन्स		०.०१	०.०४
२२	कायदेशीर सल्ला फी		---	०.१०
२३	इतर खर्च		---	---
२४	वार्षिक अहवाल छपाई		---	०.२५
२५	शिक्षण फंड तरतूद		०.०५	००.१०
२६	संशयित बुडित निधी		---	---
२७	नोकर बोनस तरतूद		---	०.२०
२८	ग्रॅच्युईटी फंड		---	---
२९	क्लिअरिंग चार्जेस		०.०४	०.१०
३०	वर्धापन दिन खर्च		---	०.१०
३१	प्रा. खर्च तरतूद		०.१६	०.१६
	नफा तोटा		०.९७	८.८०
			१७.५०	१०५.७०

सन १९९८-१९९९ सालचे अंदाजपत्रक

उत्पन्न (आकडे रु. लाखात)

अ.न.	खात्याचे नांव	३१/३/९७ चा अंदाज	९७-९८ चा प्रत्यक्ष उत्पन्न	९८-९९ चा अंदाज
१	मिळालेले व्याज कर्जावरील		१०.३२	८०.००
२	मिळालेले व्याज गुंतवणुकीवरील		६.६८	२४.५०
३	कमीशन हुंडणावळ		०.२९	०.७०
४	मिळालेला लाभांश		---	---
५	इतर जमा किरकोळ		०.०१	०.०५
६	प्रोसेस फी		०.१२	०.२५
७	इन्सीडेंटल चार्जेस		०.०७	०.१५
८	बँक गॅरंटी फी		०.०१	०.०५
			१७.५०	१०५.७०

निलकंठ अर्बन को-ऑप. बँक लि. सोलापूर

लेखा परिक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांना कायदा कलम ८१(५-ब) महाराष्ट्र सहकारी संस्थाचा
नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी **निलकंठ अर्बन को. ऑप.बँक लि. सोलापूर** या संस्थेचा सोबत जोडलेल्या ३१ मार्च १९९८ या दिनांकाचा ताळेबंद व सन ९७-९८ सहकारी वर्षाचा अखेरचा नफा तोटा पत्रक तपासले असून अहवाल देतो की,

१) माझ्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी, माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे/माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालीलप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते मला मिळालेल्या माहिती / व खुलाशाच्या आधारे

अ - ताळेबंद व नफातोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकांशी जुळते असून सदर ३१ मार्च १९९८ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहारी / (कामकाजाची) सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो व नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची / तोट्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.

ब - संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत. व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रीतीने ठेवलेली आहेत.

४) सन १९९७-९८ या वर्षासाठी संस्थेस लेखापरीक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

स्थळ :- सोलापूर

दिनांक :- २२-५-९८

एस.बी. मोरे

अप्पर लेखापरिक्षक सह.सं.(विणकर)
सोलापूर.

ओम नमः शिवाय

निलकंठ अर्बन को-ऑप. बँक लि. सोलापूर

लेखा परिक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांना कायदा कलम ८१(५-ब) महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६१ अन्वये द्यावयाचा)

मी **निलकंठ अर्बन को. ऑप.बँक लि. सोलापूर** या संस्थेचा सोबत जोडलेल्या ३१ मार्च १९९८ या दिनांकाचा ताळेबंद व सन ९७-९८ सहकारी वर्षाचा अखेरचा नफा तोटा पत्रक तपासले असून अहवाल देतो की,

१) माझ्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी, माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे/माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालीलप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते मला मिळालेल्या माहिती / व खुलाशाच्या आधारे

अ - ताळेबंद व नफातोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकांशी जुळते असून सदर ३१ मार्च १९९८ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहारी / (कामकाजाची) सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो व नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची / तोट्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.

ब - संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत. व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रीतीने ठेवलेली आहेत.

४) सन १९९७-९८ या वर्षासाठी संस्थेस लेखापरीक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

स्थळ :- सोलापूर

दिनांक :- २२-५-९८

एस.बी. मोरे

अप्पर लेखापरिक्षक सह.सं.(विणकर)
सोलापूर.

उद्‌घाटन सोहळ्याची
क्ष ण चि त्रे

सहकार मंत्री मा. श्री. जयप्रकाशजी मुंदडा
यांचा सत्कार करताना बँकेचे
संस्थापक चेअरमन श्री विश्वनाथ करवा

मा. आमदार श्री. नरसिंगजी मेंगजी यांचे
आगमन प्रसंगी स्वागत करताना बँकेच्या संचालिका
सौ. विमल लोहोटी

सोलापूर चेम्बर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजचे
चेअरमन उद्योगपती श्री. प्रेमरतनजी दमाणि
यांचा सत्कार करताना बँकेचे संचालक
श्री. विष्णुदास बंग.

मा. श्री. रामनिवासजी जाजू, संस्थापक चेअरमन
विकास सहकारी बँक यांचा सत्कार करताना
बँकेचे संचालक श्री. रमेश राठी.

सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष श्री. मनोहरभाऊ डोंगरे यांनी बँकेस सदिच्छा भेट दिली
त्याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना बँकेचे चेअरमन श्री. विश्वनाथ करवा.
छायाचित्रात बँकेचे संचालक श्री. रमेश राठी, संचालक श्री. घनश्याम जाखोटिया आणि
मुख्य व्यवस्थापक श्री. हिटलर तडकासे

बँकेच्या उद्घाटनप्रसंगी दीप प्रज्वलीत करताना बँकेचे व्हाईस चेअरमन श्री. बाबुभाई मेहता छायाचित्रात डावीकडून संचालिका सौ. विमल लाहोटी, संचालिका कु. मंगलेशा वेदमुथा, संस्थापक चेअरमन श्री. विश्वनाथ करवा, सहकार राज्यमंत्री मा. जयप्रकाशजी मुंदडा, माजी खा. लिंगराजजी वल्याळ

बँकेच्या उद्घाटन सोहळयानिमित्त जमलेली मान्यवरांची उपस्थिती

बुक-पोष्ट

श्री.रा.रा. ______________________

____

____

____

प्रेषक

विश्वनाथ करवा

चेअरमन

निलकंठ अर्बन को-ऑप. बँक लि

२०२/८, माणिक चौक, गंगनहळळी मार्केट,

शुक्रवार पेठ, सोलापूर-४१३ ००२

मुद्रक : चेरी ऑफसेट सोलापूर.